दिनांक ८ ते १२ मार्च, २०१८ या कालावधीत पंचकुला, हरियाणा येथे आयोजित अखिल भारतीय नागरी सेवा टेबल टेनिस स्पर्धा (२०१७-१८) मध्ये महाराष्ट्राचा संघ सहभागी होण्यासाठी होणाऱ्या खर्चास मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक- अभानासे- ३८१८ /प्र.क्र.२१/क्रीयुसे-२,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- ०५ मार्च, २०१८

वाचा :- (१) केंद्रीय नागरी सेवा, सांस्कृतिक कार्य आणि क्रीडा मंडळ यांचे पत्र क्रमांक- ५९/०२/२०१७-१८ /सीसीएससीएसबी; दिनांक ०७.०२.२०१८.

(२) सचिवालय जिमखान्याचे पत्र क्र.-अभानासे/टेबल टेनिस/२०१७-१८, दि.२६.०२.२०१८.

(३) उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, मुंबई विभाग, मुंबई यांचे पत्र क्रमांक-उपसंक्री/अभानासे/१७-१८/का-४/४७९, दि.२७.०२.२०१८.

: शासन निर्णय:

दिनांक ८ ते १२ मार्च, २०१८ या कालावधीत पंचकुला, हरियाणा येथे आयोजित करण्यात आलेल्या **अखिल भारतीय नागरी सेवा टेबल टेनिस स्पर्धा २०१७-१८** मध्ये भाग घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा संघ निवडण्याकरिता सचिवालय जिमखाना, मुंबई येथे दि.२३ व २४ फेब्रुवारी, २०१८ रोजी निवड चाचणी आयोजित करण्यात आली होती. या चाचणीमध्ये सहभागी झालेल्या ३५ अधिकारी व कर्मचा-यांची यादी सोबतच्या विवरणपत्र "क" प्रमाणे तर निवड चाचणीद्वारे निवडण्यात आलेला राज्याचा संघ विवरणपत्र "अ" प्रमाणे आहे. सदर स्पर्धेची निवड चाचणी, प्रशिक्षण शिबीर तसेच राज्य संघाच्या सदर स्पर्धेतील सहभागासाठी विवरणपत्र "ब" प्रमाणे **रु.८४,३७५/- (रुपये चौऱ्याऐंशी हजार तीनशे पंच्च्याहत्तर फक्त)** इतक्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

२. उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, मुंबई विभाग, मुंबई यांना सदर रक्कम आहरीत करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. संघातील ज्या खेळाडूंना किट बॅग्ज व ट्रॅकसूट मिळालेले आहेत ते खेळाडू कोणत्याही अखिल भारतीय नागरी सेवा क्रीडा स्पर्धेसाठी किटबॅग व ट्रॅकसूट दोन वर्षातून एकदा मिळण्यास पात्र ठरतील. या नियमाचे सचिवालय जिमखान्याने काटेकोरपणे पालन करावे.

४. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी संबंधित विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी खेळाडू प्रशिक्षक / व्यवस्थापक यांना दिनांक ०१.०३.२०१८ (म.नं.) पासून कार्यमुक्त करावे. तसेच या खेळाडूंच्या सेवा दिनांक ०३.०३.२०१८ ते ०५.०३.२०१८ या कालावधीतील प्रशिक्षण शिबिरासाठी सचिवालय जिमखान्यात उपलब्ध करून देण्यात याव्यात. सदर स्पर्धेत सहभागी होण्यासाठी खेळाडूंना ०६.०३.२०१८ रोजी मुख्यालय सोडण्यास परवानगी देण्यात यावी. तसेच खेळाडूंनी

दिनांक ०८.०३.२०१८ ते १२.०३.२०१८ या कालावधीतील स्पर्धेत उपस्थित राहावे. संघातील प्रत्येक खेळाडूने व व्यवस्थापकाने ते ज्यांच्या अधिपत्याखाली काम करीत असतील त्या विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांची परवानगी मिळविणे आवश्यक आहे.

५. संघातील खेळाडू, प्रशिक्षक व व्यवस्थापक यांची प्रशिक्षण शिबीर व स्पर्धा काळातील कार्यालयीन अनुपस्थिती ही शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-एलव्हीई-१४८५/प्र.क्र.८३३/ अ/सेवा-९, दिनांक ११ मे, १९८९ व क्रमांक-एलव्हीई/१४९२/४६/सेवा-९, दिनांक ३० जुलै, १९९२ अन्वये "कर्तव्य कालावधी" म्हणून समजण्यात यावा. तसेच स्पर्धा संपल्यानंतर एक दिवसानंतर खेळाडूंनी मुख्यालयास परत यावे. या सर्वाचा प्रवास भत्ता, दैनिक भत्ता व इतर भत्ते यावर होणारा खर्च संबंधित विभागाच्या / कार्यालय प्रमुखांच्या मुख्य लेखाशिर्षाखाली असणा-या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. स्पर्धेच्या निवड चाचणीसाठी उपस्थित अधिकारी / कर्मचारी (विवरणपत्र-क) यांची कार्यालयीन अनुपस्थिती शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-एलव्हीई/१४९२/४६/सेवा-९, दिनांक ३० जुलै,१९९२ अन्वये कर्तव्यार्थ म्हणून समजण्यात यावी व मुंबई बाहेरील खेळाडूंना अनुज्ञेय असलेला प्रवास / दैनिक भत्ता व इतर सवलती या वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक- एलव्हीई-१४८५/प्र.क्र.८३३/अ/सेवा-९, दिनांक ११ मे, १९८९ व वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक-एलव्हीई-१४०४/प्र.क्र.८/अ/सेवा-८, दिनांक २७ फेब्रुवारी, २००४ अन्वये विशेष बाब म्हणून मंजूर करण्यात यावी.

या सवलतीचा लाभ मिळण्यासाठी निवड चाचणीसाठी उपस्थिती असणा-या अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीबाबत मानद सचिव, सचिवालय जिमखाना यांनी दिलेले प्रमाणपत्र संबंधित कर्मचा-यांनी त्यांच्या आस्थापना कार्यासनाला सादर करणे आवश्यक राहिल.

७. सचिवालय जिमखान्याने प्रत्यक्ष खर्चाचे विवरणपत्र कोणत्याही परिस्थितीत आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, मुंबई विभाग, मुंबई यांना स्पर्धेत केलेल्या खर्चाच्या अहवालासोबत सादर करावे. तसेच जर रक्कम शिल्लक राहिली तर ती उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, मुंबई विभाग, मुंबई यांना त्वरीत परत करण्यात यावी.

८. यासाठी होणारा खर्च सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी “२२०४ क्रीडा व युवक सेवा, १०४ क्रीडा व खेळ, (०६) अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धा, (०६)(०२) अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धेत सहभाग (२२०४ १९८१), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर)” या लेखाशीर्षाखाली अर्थसंकल्पित तरतूदीतून भागविण्यात यावा.

९. सचिवालय जिमखाना यांच्याकडून स्पर्धेचा अहवाल, बाबनिहाय प्रत्यक्ष झालेल्या खर्चाचा तपशील, विनियोग प्रमाणपत्र, परिक्षित लेखा विवरणपत्र व मंजूरी आदेशातील सर्व अटींची पूर्तता करण्याच्या अटीवर विवरणपत्र "ब" प्रमाणे खर्चास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०६१०२६२७८५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.06 10:27:34 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, पुणे विभाग, पुणे
३. उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, मुंबई विभाग, मुंबई,
४. जिल्हा क्रीडा अधिकारी, मुंबई.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई-४०० ०२१.
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
७. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
८. वित्त विभाग (व्यय-११), मंत्रालय, मुंबई.
९. मानद महासचिव, सचिवालय जिमखाना, मुंबई-४०० ०३२ (५ प्रती)
१०.संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचे कार्यालये (सचिवालय जिमखान्यामार्फत)
११. निवड नस्ती (क्रीयुसे-२).

<u>विवरणपत्र "अ"</u>

दिनांक ८ ते १२ मार्च, २०१८ या कालावधीत पंचकुला, हरियाणा येथे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय नागरी सेवा टेबल टेनिस स्पर्धा २०१७-१८ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या टेबल टेनिस संघाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या स्पर्धकांची नावे दर्शविणारे विवरणपत्र.

क्र.	खेळाडूचे नाव व पदनाम	ट्रॅकसूट	किटबॅग	विभाग/ कार्यालय
१	श्री. प्रेमजित रणनवरे राज्यकर सह आयुक्त	नाही	नाही	विक्रीकर सह आयुक्त, सीमा तपासणी नाके, नोडल-११, विक्रीकर भवन, मुंबई.
२	श्री. नितीन डोळस फ्रॅकीग ऑपरेटर	नाही	नाही	शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३	श्री. अशोक कळंबे सहयोगी प्राध्यापक	नाही	नाही	संचालक, शासकीय विज्ञान संस्था, गडचिरोली.
४	श्री. उदय परुळेकर,	नाही	नाही	अधिष्ठाता, सर जे. जे समूह रुग्णालय, भायखळा, मुंबई-०८
५	श्री. शंकरलाल मंशानी शाखा अभियंता	होय	होय	गुणनियंत्रण विभाग, उपविभाग नं. ४, पिप्री, वर्धा.
६	श्री. रविंद्र कुलकर्णी, अप्पर जिल्हाधिकारी	होय	होय	सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर
७	श्री. रविंद्र देवधर, शाखा अभियंता	होय	होय	अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र प्राधिकरण, पनवेल, नवी मुंबई.
८	सौ. अंजली मातोडकर, वास्तुशास्त्रज्ञ	होय	होय	मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सार्वजनिक बांधकाम विभाग, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई.
९	सौ. सुरेखा पहुरकर, विक्रीकर निरिक्षक	होय	होय	राज्य कर सह.आयुक्त ,नोडल-१२ ,१ला माळा विक्रीकर भवन ,माझगांव ,मुंबई-१०
१०	श्रीमती रोहिणी आयलावार नायब तहसिलदार	होय	होय	जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर
११	श्रीमती पी.व्ही. उंबरे लिपिक	होय	होय	जिल्हाधिकारी कार्यालय, (सा.प्र. विभाग) उस्मानाबाद.
१२	श्रीमती सत्वयिला शिंदे, तहसिलदार	होय	होय	उपजिल्हाधिकारी, बोरीवली, मुंबई.
१३	श्रीमती रंजना मा. भोसले, लिपिक	होय	होय	जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

११	श्री. आर.सी. शाह जिल्हा विशेष लेखापरिक्षक,वर्ग-१ व्यवस्थापक	नाही	नाही	विभागीय सहनिबंधक (लेखा परिक्षण) सहकारी संस्था, मुंबई विभाग, नवी मुंबई.
१२	श्री. शिरीष दामले, राज्य कर निरिक्षक प्रशिक्षक	नाही	नाही	राज्यकर उपायुक्त, आस्थापना-२, वस्तू व सेवा कर विभाग, माझगाव, मुंबई.

Rajendra
Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.06 10:27:47 +05'30'

(राजेंद्र पवार)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

विवरणपत्र "ब"

दिनांक ८ ते १२ मार्च, २०१८ या कालावधीत पंचकुला, हरियाणा येथे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय नागरी सेवा टेबल टेनिस स्पर्धा २०१७-१८ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या टेबल टेनिस संघासाठी होणाऱ्या खर्चाचे विवरणपत्र.

क्र.	तपशील	रुपये
अ)	**निवड चाचणी आयोजनापूर्वीचा खर्च.**	
१	निवड चाचणीसाठी टेबल आणणे, मांडणे व त्यासाठी टेम्पो खर्च (हमाली सह)	२,०००/-
२	लेखन सामुग्री खर्च.	५००/-
ब)	**निवड चाचणी आयोजनाचा खर्च.**	
१	प्रमुख पंच व इतर दोन पंच यांचे मानधन (दोन दिवस) (१००० + ५००+५००)	२,०००/-
२	निवड चाचणीस उपस्थित जिमखाना पदाधिकारी/ प्रतिनिधी व पंच यांच्याकरिता चहा/ अल्पोपहारावरील खर्च. (२ दिवसांचा खर्च)	१,५००/-
३	निवड चाचणीसाठी १ डझन टेबल टेनिस चेंडू. (Stag T.T. Ball ३ Star)	१,३००/-
क)	**प्रशिक्षण शिबीराकरिता खर्च.**	
१	**आयोजनाचा खर्च.** (३ दिवसाचा प्रशिक्षण शिबीराकरिता खेळाडू, व्यवस्थापक/ प्रशिक्षक यांच्या चहा व अल्पोपहारावरील खर्च.)	२,०००/-
२	३ दिवसाच्या प्रशिक्षण शिबीरासाठी प्रशिक्षकांचे मानधन व प्रवास भाडे.	१,५००/-
३	२ डझन टेबल टेनिस चेंडू. (Stag T.T. Ball ३ Star)	१,३००/-
४	लाईट शेड्स लावणे, प्रकाश योजनेवर करावा लागलेला खर्च. (३ दिवसाचा खर्च)	१,०००/-
५	औषधे (रेली स्प्रे) व किरकोळ.	५५०/-
ड)	**संघासाठीसाहित्य**	
१	२ टेबल टेनिस बॅट रु.५,०००/- प्रमाणे.	१०,०००/-
२	२ डझन टेबल टेनिस चेंडू. (Stag T.T. Ball ३ Star)	२,६००/-
इ)	**वैयक्तीक क्रीडा साहित्य खरेदीसाठी होणारा खर्चः-**	
१	९ ट्रॅकसूट रु. ७००/- प्रमाणे.	६,३००/-
२	९ किटबॅगस प्रत्येकी रु.५००/- प्रमाणे.	४,५००/-
३	३० टि शर्टस् रु. ५००/- प्रमाणे.	१५,०००/-
४	३० शॉटर्स रु. ५००/- प्रमाणे.	१५,०००/-
५	१५ जोडी पायमोजे प्रत्येकी रु.७५/- प्रमाणे.	१,१२५/-
६	१५ बूटांचे जोड प्रत्येकी रु. ७००/- प्रमाणे.	१०,५००/-
७	१५ टॉवेल्स प्रत्येकी रु. १००/- प्रमाणे.	१,५००/-
८	९ ब्लॅक पॅन्थर सपोर्टर रु. ३००/- प्रमाणे.	२,७००/-
फ)	**प्रथमोपचाराकरिता खर्च.**	
१	ग्लुकोज/औषधे/ स्प्रे इत्यादीसाठी खर्च.	५००/-
२	किरकोळ खर्च.	१,०००/-
	एकूण रुपये: (रुपये चौऱ्याऐंशी हजार तीनशे पंच्याहत्तर फक्त)	**८४,३७५/-**

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.06 10:27:57 +05'30'

(राजेंद्र पवार)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

विवरणपत्र - क

दिनांक ८ ते १२ मार्च, २०१८ या कालावधीत पंचकुला, हरियाणा येथे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय नागरी सेवा टेबल टेनिस स्पर्धा २०१७-१८ मध्ये भाग घेणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या टेबल टेनिस संघाची निवड करण्यासाठी दि. २३ व २४ फेब्रुवारी, २०१८ रोजी निवड चाचणीसाठी उपस्थित राहिलेले अधिकारी कर्मचारी खेळाडूंची नावे विवरणपत्र.

क्र.	खेळाडूचे नाव	पदनाम	कार्यालयाचा पूर्ण पत्ता
१	डॉ. मनीष बात्रा	दंत चिकित्सक	सिव्हील सर्जन हॉस्पीटल, भंडारा.
२	श्री. एम डी.जोंधळेकर	सिव्हील इंजिनिअर	कार्य.अभियता कोल्हापूर पाटबंधारे विभाग, सिंचन भवन, कोल्हापूर
३	श्री. रविंद्र कुलकर्णी	अति. जिल्हाधिकारी	सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर.
४	श्री. संजीव सुरवसे	कृषि सहाय्यक	तालुका कृषि कार्यालय, गांगखेड, परभणी.
५	श्री. रविंद्र देवधर	शाखा अभियंता	महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवीन पनवेल.
६	श्री. सुनील कोळी	राज्य कर निरीक्षक	Joint Commissioner of Sales Tax (P.T.) Mumbai.
७	श्री. संजय वतर्क	राज्य कर निरीक्षक	Dy. Commissioner of State Tax (E-००३) Investigation-B, Mumbai
८	श्री. वसंता ना. हेडाऊ	लिपिक टंकलेखक	आस्थापना अधिकारी, नोडल-५, विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई.
९	श्री. प्रदीप दे.दोंदडकर	राज्य कर निरीक्षक	वि. स.आ. ७०४, नोडल-९, विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई
१०	श्री. शिरीष दामले	राज्य कर निरीक्षक	वि. स.आ. अन्वेषण-अ, विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई
११	श्री. मेघशाम दमाले	कृषि सहाय्यक	तालुका कृषि कार्यालय, चांदवड, नाशिक.
१२	डॉ. अशोक कळंबे	सहयोगी प्राध्यापक	प्राचार्य, शासकीय विज्ञान कॉलेज, गडचिरोली.
१३	श्री. शंकर मंशानी	शाखा अभियंता	गुणनियंत्रण विभाग, उपविभाग नं. ४, पिप्री, वर्धा.
१४	श्री. उदय म. परुळेकर	क्ष-किरण तंत्रण	सहयोगी अधिष्ठाता, सरजे.जे.रुग्णालय, मुंबई- ८
१५	श्री. नितिन डोळस	फ्रॉकिंग ऑपरेटर	शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१६	श्री. प्रेमजीत रणनवरे	सहा. विक्रीकर आयुक्त	विक्रीकर सह आयुक्त, सीमा तपासणी नाके, नोडल-११, विक्रीकर भवन, मुंबई.
१७	श्री. अनंत शेटये	अवर सचिव	महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई- ४०० ०३२
१८	श्री. राजेंद्र पवार	उपसचिव	शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१९	श्री. प्रशांत साजणीकर	उपसचिव	जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
२०	श्री. पुरुषोत्तम गावडे	कक्ष अधिकारी	जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
२१	श्री. आर.सी. शहा	जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-२	विभागीय सह निबंधक, (लेखापरिक्षण) सहकारी संस्था, मुंबई.
२२	श्री. प्रताप माडकर	कक्ष अधिकारी	महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
२३	श्री. सुहास चव्हाण	अवर सचिव	शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई

२४	श्री. मदन बावसकर	वरीष्ठ स्वीय सहाय्यक	नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
२५	सतीश सोनवाने	सहा.कक्ष अधिकारी	जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
२६	श्री. सुनिल आगरकर	कक्ष अधिकारी	महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
२७	श्री. संजय पोफळे	सहा.कक्ष अधिकारी	नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
२८	श्री. वेदपाठक	सहा.कक्ष अधिकारी	जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२९	श्रीमती रोहणी आयलावार	नायब तहसिलदार	जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर.
३०	श्रीमती अंजली मातोडकर	वास्तुशास्त्रज्ञ	मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांचे कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, फोर्ट, मुंबई
३१	श्रीमती पी.व्ही. उंबरे	लिपिक	जिल्हाधिकारी कार्यालय (सा.प्र. विभाग) उस्मानाबाद
३२	श्रीमती सत्वशिला शिंदे	तहसिलदार	उपजिल्हाधिकारी, बोरीवली, मुंबई.
३३	श्रीमती रंजना मा. भोसले	लिपिक	जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
३४	सौ. आश्विनी थोरवे	सहा.कक्ष अधिकारी	महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
३५	श्रीमती सुरेखा पहुरकर	राज्य कर निरिक्षक	राज्यकर सहआयुक्त, नोडल-१२, विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई-१०

Rajendra
Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.06 10:28:08 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन